लोकमत पृ. पान क्र. 1

## अश्लील हावभाव, गुन्हा दाखल

**नालासोपारा :** सार्वजनिक ठिकाणी अश्लील हावभाव केल्याप्रकरणी वसईत तीन महिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसई पश्चिम बस डेपोजवळील रिक्षा स्टँडजवळील स्कायवॉकच्या पायरीवर शनिवारी संध्याकाळी ३६ ते ४५ वयोगटातील तीन महिला अश्लील हावभाव व अंगविक्षेप करून पुरुष गिऱ्हाईकांना आकर्षित करीत असल्याची माहिती माणिकपूर पोलिसांना मिळाली होती. माणिकपूर पोलिस ठाण्याच्या महिला पोलिस प्रगती सूर्यवंशी यांनी तीन महिलांना ताब्यात घेऊन कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे.

## पेल्हारमधून गुटखा जप्त

**नालासोपारा :** पेल्हारच्या वनोठापाडा येथील रामलखन चाळीतील एका गाळ्यात २४ एप्रिलला रात्री १५ लाख ४३ हजार १०४ रुपये किमतीच्या गुटख्याचा साठा विक्रीसाठी साठविलेला आढळून आला. पोलिस हवालदार गोरखनाथ खोत यांनी गुरुवारी पेल्हार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन आरोपी पंडित ऊर्फ राम गिरी, उमेश जयस्वाल, पिंटू जयस्वाल या तिघांविरोधात गुन्हा दाखल केला.

## रखवालदाराच्या झोपडीत चोरी

**मीरा रोड :** मीरारोडच्या विनय नगर जैन मंदिराच्या मागील झोपडपट्टीत मकबूल सरफुद्दीन अन्सारी (२४) हा रखवालदार राहतो. मध्यरात्री ते पहाटेच्या दरम्यान त्याच्या झोपडीच्या मागील प्लास्टिक फाडून चोरट्याने घरातील ४ हजार रोख, दागिने व दोन मोबाइल असा २६ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी २६ एप्रिल रोजी काशिगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मुलाची आत्महत्या



**नालासोपारा :** शांती पार्कच्या निलगंगा अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या साहिल कोरे (१७) या अल्पवयीन मुलाने आत्महत्या केली आहे. त्याने शुक्रवारी संध्याकाळी घरातील हॉलमधील पंख्याला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. नालासोपारा पोलिसांनी शनिवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

लोकमत पान क्र. 3

## दुचाकीचालकाचा अपघाती मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** जुचंद्रच्या स्वामी समर्थ चाळीत राहणाऱ्या युवराज पांडे (१९) या दुचाकीचालकाचा अपघाती मृत्यू झाला आहे. युवराज हा शुक्रवारी संध्याकाळी दुचाकीवरून जुचंद्र गावाकडून नायगाव रेल्वे स्टेशनकडे जात होता.

पिकअप गाडीचा चालक कमलेश यादवने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष केले. आपल्या ताब्यातील पिकअप गाडी हयगयीने चालवून युवराजच्या दुचाकीला ठोकर मारून अपघात केला. युवराजच्या डोक्यास, चेहऱ्यास, गंभीर दुखापत झाल्याने त्याचा मृत्यू झाला.

CamScanner

लोकमत पान क्र. 4

# विदेशात बड्या पगाराच्या नोकरीचे आमिष देत अनेकांना लाखोंचा गंडा

## आ. गीता जैन यांच्या मागणीनंतर पोलिसांकडून गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरारोड :** परदेशात नोकरी देण्याचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या भामट्यांवर आ. गीता जैन यांच्या मागणीनंतर नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. २०० पेक्षा जास्त लोकांची या टोळीने फसवणूक केल्याची शक्यता असून,फसवणूक झालेल्या रकमेचा आकडा ८१ लाख रुपये इतका आहे.

साऊथ आफ्रिका, इराण, इराक आदी देशांमध्ये चांगल्या पगाराची नोकरी देण्याच्या जाहिराती सोशल मीडियावर देण्यात आल्या. त्यात भाईंदर येथील इगल प्लेसमेंट या कार्यालयाचा पत्ता होता. कार्यालयात नोकऱ्यांसाठी कामे करताना स्वतःची नावे साहिल शेख, सुरुची आणि नरसुल्लाह अहमद शेख अशी फोन करणारे सांगत होते. यात देशातील अनेकांनी पैसे भरले व आपले पासपोर्ट जमा केले. परंतु, नोकरी नाही, पैसेही परत मिळाले नाही. पासपोर्टदेखील मिळाला नाही.



तक्रारीसाठी गेल्यावर नवघर पोलिसांकडून तत्काळ दखल घेतली न गेल्याने फसवणूक झालेल्या लोकांनी आ. गीता जैन यांची २७ एप्रिल रोजी भेट घेतली.

### १५९ जणांचे पासपोर्ट केले परत

**१** फसवणुकीचा प्रकार गंभीर असल्याने गुन्हा दाखल करून आरोपींना अटक करा आणि लोकांचे पासपोर्ट आणि पैसे परत मिळवून द्या, अशी मागणी आ. जैन यांनी पोलिस आयुक्त मधुकर पाण्डेय यांच्याकडे केली. पोलिसांनी पंजाबच्या पठाणकोटमधील बनवाल गावातून आलेल्या पवन नसीब सिंग (३८) यांच्या फिर्यादीवरून साहिल शेख, सुरुची आणि नरसुल्लाह अहमद शेख या तिघांवर गुन्हा दाखल केला.

**२** पोलिसांनी इगल प्लेसमेंट कार्यालयात छापा टाकून १६६ जणांचे पासपोर्ट जप्त केले. गेल्या दोन दिवसांत पोलिसांनी १५९ जणांचे पासपोर्ट परत केले असून, त्यांच्या फसवणुकीबद्दल जबाब नोंदवून घेतला आहे. या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक धीरज कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक विशाल धायगुडे करत आहेत.



# वेश्या व्यवसाय करणाऱ्या तीन महिलांची सुटका

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** यशवंत विवा टाऊनशिप येथील पंचकर्मा बॉडी केअर याठिकाणी वेश्या व्यवसाय करणाऱ्या तीन पीडित महिलांची शनिवारी सकाळी सुटका करण्यात नालासोपारा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाला यश मिळाले आहे.

आरोपी महिला शबाना उर्फ सोनम शेख (२४) या वेश्यादलालाने २३ ते ४४ वर्षीय पीडित महिलांना स्वतःच्या फायद्यासाठी पैशाचे आमिष दाखवून पुरुष ग्राहकांकडून पैसे स्वीकारले.

आरोपी महिला शबाना ही पीडित महिलांकडून वेश्याव्यवसाय करून घेऊन यातून मिळणारे कमिशन म्हणून पैसे स्वीकारताना पोलिसांना सापडली आहे. महेश शेट्ट्ये यांनी आचोळे पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner
CamScanner
CamScanner

पुढारी ५ ५।७ पृ. १

# नालेसफाई करताना आढळले मृत अर्भक

मीरा रोड : पुढारी वृत्तसेवा

भाईंदर पूर्वेच्या फाटकाजवळील सालासर कमर्शियल बिल्डिंग येथे नालेसफाई करत असताना शनिवारी नाल्यात एक नवजात मृत अर्भक मिळाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. नालेसफाई करणाऱ्या कामगारांनी या घटनेची माहिती तात्काळ नवघर पोलिसांना दिली. या घटनेची माहिती परिसरातील नागरिकांना कळताच हळहळ व्यक्त करण्यात येत असून नवजात अर्भकाला नाल्यात फेकून देणाऱ्या आई-वडिल व कुटुंबियांवर खुनाचा गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

मीरा भाईंदर शहरात पावसाळा पूर्व नालेसफाईचे काम सुरू आहे. भाईंदर पूर्वेच्या सालासर कमर्शियल बिल्डिंग येथे नालेसफाईचे काम करत असताना कामगारांना नाल्यात एक नवजात मृत अर्भक आढळून आले. कामगारांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांना माहिती मिळताच नवघर पोलीस ठाण्याचे एक पथक घटनास्थळावर दाखल झाले. पोलिसांनी ते मृत नवजात अर्भक ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांनी भाईंदर पश्चिमेच्या भारतरत्न पंडित भीमसेन जोशी टेंबा रुग्णालयात दाखल केले. तसेच पोलिसांनी आजूबाजूच्या परिसरातील व नाला परीसरातील सुरुवाती पासून ते शेवटपर्यंत असलेले सीसीटीव्हीचे कॅमेरे फुटेज तपासण्याचे काम सुरू केले आहे. यावरून त्या नवजात अर्भकाला नाल्यात कोणी फेकले याचा तपास नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक धीरज कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## तलवार जप्त, चौघांवर गुन्हा

पालघर : निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हत्यारे व शस्त्र बाळगण्यास बंदी असताना नायगाव येथील न्यू गिरनार इमारतीच्या एका फ्लॅटमधून पोलिसांना तलवार असल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी त्या ठिकाणी धाड टाकून तलवार जप्त केली आहे. तलवारी सोबत समाज माध्यमांवर फोटो टाकल्यानंतर तलवार पुरवणाऱ्या व्यक्तींवरही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. धर्मेंद्र मिश्रा, शिरीष मिश्रा, ओंकार सिंग आणि संगम पांडे यांच्या विरोधात याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## तलावात बुडून मृत्यू

पालघर: नालासोपारा भागातील डांगेवाडी टाकीपाडा भागामध्ये असलेल्या तलावात एका नऊ वर्षाच्या मुलीचा बुडून मृत्यू झाला आहे. ती खेळता खेळता घरा-नजीकच्या तलावाजवळ पोहोचली. त्यानंतर तिचा अचानक तोल गेला व ती तलावात पडली. त्यात तिचा बुडून मृत्यू झाला. पोलिसांनी व स्थानिकांनी तिला बाहेर काढले. मात्र तिचा मृत्यू झाला होता तिचा शव शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. नालासोपारा पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## गांजा जप्त

पालघर: वालीव पोलिसांनी मोहम्मद फैजान खान या २२ वर्षीय तरुणाकडून २५ हजार रुपये किमतीचा दोन किलो गांजा जप्त केला आहे. शुक्रवारची ही घटना असून धुमाळ नगर परिसरामध्ये बॅगेमधून हा गांजा तरुण घेऊन जात होता. यावेळी त्याची झडत घेतली. या झडतीत गांजासह मोबाईल व सातशे रुपये रोख पोलिसांनी त्याच्याकडून जप्त केली असून तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

## मोलकरणीने केले घर साफ

पालघर : घरच्या मोलकरणीने तीन लाख रुपयांच्या जवळपासच्या सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना आचोळे पोलीस ठाणे क्षेत्रात घडली आहे. वसंत नगरी भागात राहणाऱ्या रंजना सिंग यांच्या घरी ही चोरी २२ ते २५ एप्रिल दरम्यान त्यांची नोकर दुलारी देवी हिने केली आहे. आचोळे पोलिसांनी याप्रकरणी शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner
CamScanner
CamScanner

म.टा. पु. पान क्र. १

# वाहनांची तपासणी होणार

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वाहनांची तपासणी करण्यासाठी आणि चालणाऱ्या आर्थिक देवाणघेवाणीवर लक्ष ठेवण्यासाठी निवडणूक विभाग सज्ज झाला आहे. वसई आणि नालासोपारा विधानसभा मतदारसंघात भरारी पथके आणि स्थिर सर्वेक्षण पथक तयार करण्यात आले असून याद्वारे दिवस-रात्र वाहनांची तपासणी करण्यात येत आहे.

पालघर लोकसभा मतदारसंघात येत्या २० मे रोजी निवडणूक होणार आहे. आचारसंहितेचा भंग होऊ नये यासाठी निवडणूक विभागातर्फे वसई आणि नालासोपारा विधानसभा मतदारसंघात भरारी पथके आणि स्थिर पथके तैनात करण्यात आली आहेत.



या पथकामध्ये महापालिका कर्मचारी, पोलिस कर्मचारी, व्हिडीओग्राफर अशांचा समावेश आहे. तसेच यावर गस्तीने अधिकाऱ्यांमार्फत नियंत्रण ठेवण्यात येत आहे. ही पथके नेमलेल्या ठिकाणी तपासणी करत आहेत. नायगाव, वसई, नालासोपारा, विरार रेल्वेस्थानकात परिसरात, मुख्य उड्डाणपुलाच्या ठिकाणी, मुख्य चौकात तपासणी पथक नियुक्त करण्यात आले आहेत.

निवडणूक काळात मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार होत असतो. तो रोखण्यासाठी हे पथक काम करत आहे. प्रामुख्याने वाहनांची तपासणी करणे, संशयास्पद व्यक्तींच्या बॅगा तपासणे, कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यावर या पथकांमार्फत लक्ष ठेवले जात आहे. गैरप्रकार आढळल्यास किंवा आचारसंहितेचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित पथकामार्फत तात्काळ कारवाई करण्याचे आदेश पथकांना देण्यात आले आहेत. तपासणी पारदर्शक व्हावी यासाठी चित्रीकरणदेखील करण्यात येत आहे. नालासोपारा विधानसभाक्षेत्रात भरारी ९ भरारी पथक आणि १२ स्थिर पथक नियुक्त करण्यात आली आहेत.

पुण्य नगरी पान क्र. २

# तरुणीवर अत्याचार करणाऱ्या ६ जणांवर गुन्हा

**मीरा रोड :** मीरा रोड येथे राहणाऱ्या २६ वर्षीय तरुणीबरोबर मैत्री करून तिच्यावर अत्याचार करण्यात आला. तिची अश्लील छायाचित्रे काढून ब्लॅकमेल करत पैसे उकळले तसेच वारंवार अत्याचार करून तिचे केस कापून तिला विद्रुपही करण्यात आले. याप्रकरणी नयानगर पोलीस ठाण्यात ६ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मीरा रोड येथे राहणारी पीडित तरुणी २६ वर्षांची आहे. तरुणी कुटुंबासह राहत असून ती महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. तरुणीने नयानगर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार सप्टेंबर २०२३ मध्ये सोसायटीतील सार्वजनिक गणपती मंडळाने कल्याण येथून एका ढोलताशा पथकाला मिरवणुकीसाठी बोलावले होते. त्यावेळी पथकातील मोहसीन शेख याच्याशी पीडितेची ओळख झाली. ओळखीतून त्यांची मैत्री झाली. नंतर मोहसीन शेख याने तिच्या इन्स्टाग्रामवर प्रेम करत असल्याचे मेसेज पाठवले. त्यावेळी तिने आपली फक्त मैत्री असल्याचे सांगितले. ऑक्टोबर महिन्यात तरुणीचे आई व भाऊ हे काही दिवसांसाठी बाहेर गेले होते. हे मोहसीनला समजले असता, एके दिवशी तो तरुणीच्या घरी बिर्यानी घेऊन आला. त्याने बिर्यानी खायला दिली. त्यात गुंगी आणणारे पदार्थ मिसळले होते. यानंतर पीडिता बेशुद्ध झाल्यानंतर त्याने तिच्यावर अत्याचार केला आणि तिची अश्लील छायाचित्रे काढली.नंतर अश्लील छायाचित्रे प्रसारित करण्याची धमकी देऊन त्याने तिच्याशी वारंवार बळजबरी करून शरीरसंबंध प्रस्थापित केले. तिच्या डोक्यावरील केस काढून तिला विद्रुप केले. तिला ब्लॅकमेल करून तिच्याकडून रोख व सोन्याचे दागिने असे मिळून पावणेतीन लाख रुपये उकळले, असा आरोप पीडितेने तक्रारीत केला आहे. आरोपी मोहसीन शेख याचे भाऊ जाफर, मोबिन, मेव्हणा अशफाक शेख यांनीही तिचा विनयभंग केला. काका इम्रान बागवान याने तिला मारहाण केली. पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून नयानगर पोलिसांनी सहा जणांविरोधात फसवणूक, बलात्कार आणि मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner
CamScanner
CamScanner

आपलं महानगर | My महानगर.com

# पोलीस आयुक्तालयातून गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई

## आतापर्यंत १० जणांवर चार जिल्ह्यांतून तडीपारीची कारवाई

**आपलं महानगर वृत्तसेवा/**

✦**भाईंदर । लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मीरा -भाईंदर, वसई -विरार पोलीस आयुक्तालय परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या आदेशानुसार तिन्ही पोलीस उपायुक्त परिमंडळाच्या पोलीस उपायुक्तांना आदेश देण्यात आले होते. त्यानुसार तिन्ही परिमंडळाच्या पोलीस उपायुक्तांनी आतापर्यंत अनेक सराईत गुन्हेगारांवर तडीपार, प्रतिबंधात्मक कारवाई करत हद्दपार, स्थानबद्ध, अशा कारवाई केल्या आहेत.**

मीरा-भाईंदर, वसई -विरार पोलीस आयुक्तालय हे ठाणे व पालघर जिल्ह्यात संयुक्त आहे, त्यामुळे याठिकाणी दोन लोकसभा मतदार संघ आहेत. त्यानुसार अशा कारवाई करण्यात आल्या आहेत. तसेच येत्या काही दिवसात प्रतिबंधात्मक कारवाई अधिक तीव्र केली जाणार आहे, यात परिस्थिती प्रमाणे आरोपीवर मोक्कांअंतर्गत सुद्धा कारवाई केली जाणार आहे. एका मीरा- भाईंदर परिमंडळ - १ मधून आतापर्यंत १० जणांवर कारवाई करण्यात आली आहे. सराईत गुंडांना ठाणे, पालघर, बृहन्मुंबई, मुंबई उपनगर, या जिल्हा कार्यक्षेत्रातून तडिपार केले आहे. तसेच मारामारी, खून किंवा खुनाचा प्रयत्न, लुटमारी, दहशत निर्माण करणे, शस्त्र बाळगणे, अमली पदार्थ विक्री करणे, मालमत्तेवर कब्जा करणे, सरकारी जागेवर अतिक्रमण करून अनधिकृत बांधकामे करणे, दुसऱ्यांच्या जमिनीवर अतिक्रमण करून विक्री करणे, भूमाफिया, वाळू तस्कर, निवडणुकीत उपद्रवी ठरणारे संशयित, सोशल मीडियावर तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणारे यांना नोटिसा, असे संशयीत गुन्हेगारांचे वर्गीकरण करून त्यांच्या विरोधात काही अट्टल गुन्हेगारांवर तडीपाराची तर काहींवर स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे.




Palghar Edition
Apr 29, 2024 Page No. 5
Powered by: erelego.com

CamScanner